स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत येणाऱ्या पदवी स्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांचा व्यावसायिक विकास : एक चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या शिक्षणशास्त्र
विद्याशाखेअंतर्गत शिक्षणशास्त्र विषयाच्या पी.एच.डी.साठी
प्रस्तुत करावयाचा संशोधन आराखडा

:: संशोधक ::

श्री. रवि अरुण नरवाडे

:: मार्गदर्शक ::

डॉ. कदम व्यंकट काशिनाथराव

सहाय्यक प्राध्यापक, वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय,
शिरुर ताजबंद ता. अहमदपुर जि. लातूर

:: संशोधन स्थळ ::

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

:: शैक्षणिक वर्ष ::

2017-19

अनुक्रमणिका

अ.क्र	**तपशील**	**पृष्ठ क्रमांक**
I	मुख्यपृष्ठ	
II	अनुक्रमणिका	
1.	प्रस्तावना	
2.	संशोधनाची गरज	
3.	संशोधनाचे महत्व	
4.	संशोधनाचे शीर्षक	
5.	कार्यात्मक व्याख्या	
6.	गृहितके	
7.	उद्दिष्टे	
8.	परिकल्पना	
9.	संशोधनाची व्याप्ती	
10.	संशोधन मर्यादा	
11.	संशोधन परिमर्यादा	
12.	संशोधन पध्दती	
13.	संशोधन साधने	
14.	जनसंख्या	
15.	न्यादर्श	
16.	सांख्यिकीय तंत्र	
17.	प्रत्यक्ष कार्यावाही	
18.	अंदाजपत्रक	
19.	वेळापत्रक	
20.	संदर्भ सुची	

1. प्रस्तावना :-

संयुक्त राष्ट्र संघटनेने 1975 हे वर्षे जागतिक महिला वर्षे म्हणून साजरे केले. तर 1975 ते 1985 हे दशक जागतिक महिला विकास दशक म्हणून घोषित केले. या दशकाच्या अंतर्गत जागतिक स्तरावर महिलांची व्यावसायीक, आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीची माहिती घेण्यातत आली. या माहितीतून संपुर्ण मानव जातीला शरमेने मान खाली घालावी लागेल अशा प्रकारची सत्यता समोर आली. कारण या अहवालातून महिलावरील गंभीर प्रकारच्या अत्याचाराची अन्यायाची वाचा फुटली व महिला आजही किती सुस्थितीत आहेत याची माहिती मिळाली. भारताने सदरील निष्कर्षाचा उपयोग करुन आपल्या देशाची स्त्री विषयक निती तयार केली. आज स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहे. परंतू तीला आज सुध्दा समाजाकडून किंवा इतराकडून अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

भारतामध्ये स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून अनेक प्रकारच्या योजना राबविल्या जातात. परंतू त्याचा उपयोग फक्त सोयी सुविधा व अनुदान लादण्यापुरताच होतो. स्त्री सक्षमीकरणासाठी शासकिय स्तरावरील योजना सोबत समाजाची व कुटूंबाची भूमिका फार महत्वाची आहे.

पदवीस्तरावर कार्य करतांना महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक होणे फार महत्वाचे आहे. कारण जर त्यांचा व्यावसायीक झाला तर त्यांच्यामुळे त्या उच्च पदावर जातील व त्याचा माध्यमातून त्या समाजासाठी एक आदर्श ठरतील आणि त्यांच्या प्ररणेमुळे इतर महिलांना सुखाचे भविष्य घडविण्यासाठी चालणा मिळेल. म्हणून सदरील संशोधनाच्या माध्यमातून महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकास संदर्भात माहिती घेऊन नविन दिशा देण्यासाठी सदरील संशोधन करण्याचे योजीले आहे.

2. संशोधनाची गरज :-

1. पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासाचा शोध घेण्यासाठी.

2. पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासाचा अभ्यास करण्यासाठी.
3. पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासाचा व मार्गदर्शनाचा अभ्यास करण्यासाठी.

3. संशोधनाचे महत्व :-

1. पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासाचा अभ्यास करण्यासाठी सदरील संशोधन महत्वपूर्ण ठरेल.
2. पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासाचा शोध घेण्यासाठी सदरील संशोधन महत्वपूर्ण ठरेल.
3. पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासाची माहिती करुन घेण्यासाठी सदरील संशोधन महत्वपूर्ण ठरेल.
4. पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या सेवा अंतर्गत व व्यावसायीक विकासाची व त्यासाठी मदत करणाऱ्या घटकांची माहिती करुन घेता येईल.

4. संशोधनाचे शीर्षक :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत येणाऱ्या पदवी स्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांचा व्यावसायिक विकास : एक चिकित्सक अभ्यास

5. कार्यात्मक व्याख्या :-

1. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे विभाजन करुन 17 सप्टेंबर 1994 रोजी स्थापन झालेले विद्यापीठ म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ.

2. पदवी स्तर

10 + 2 + 3 या स्तरावर मिळणारे शिक्षण म्हणजे पदवी स्तर होय. उदा. बी.ए.,बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड.

3. महाविद्यालय

विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी एक औपचारिक शिक्षण संस्था जी शासन मान्य असून तीला अभ्यासक्रम व मार्गदर्शन पुरविण्याचे कार्य त्या क्षेत्रातील विद्यापीठ करते ते म्हणून महाविद्यालय होय.

4. महिला प्राध्यापक

महाविद्यालयीन स्तरावर कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करुन प्रचलीत नियमानुसार कार्यरत असणारी स्त्री म्हणजे महिला प्रध्यापक होय.

5. व्यावसायीक विकास

सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेशी संबंधीत केलेले इतर विकासात्मक कार्य म्हणजे व्यावसायीक विकास होय.

6. चित्कीत्सक अभ्यास

कोणत्याही विषयाचे ज्ञान मिळवण्यासाठी सखोल अभ्यासपूर्ण, शोधक माहिती मिळवणे म्हणजे चित्कत्सक अभ्यास होय.

6. गृहितके :-

1. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांची व्यावसायीक पात्राता पूर्ण प्राप्त झाल्यावर नेमणुक केली जाते.
2. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांचा व्यावसायीक विकास होणे गरजेचे आहे.
3. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांचा व्यावसायीक कार्यावर वैवाहिक परिस्थीतीचा प्रभाव होतो.

4. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापक इतर प्राध्यापकाप्रमाणे व्यावसायीक कार्यात सहभागी होतात.

7. उद्दीष्टे :-

1. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक कार्याचा शोध घेणे.
2. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासाचा आढावा घेणे.
3. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासात कुटूंबांची भुमिका शोधने.
4. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकास विषयक शिफारशी देणे.

8. परिकल्पना :-

1. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासावर विवाहीक जिवनाचा सार्थ फरक जाणवतो.
2. पदवीस्तरावर कार्यरत महिला प्राध्यापक व अविवाहीत महिला प्राध्यापक यांच्या व्यावसायीक विकासात सार्थ फरक आहे.
3. पदवीस्तरावर कार्यरत शहरी भागातील महिला प्राध्यापक व ग्रामिण भागातील महिला प्राध्यापक यांच्या व्यावसायीक विकासात फारक आहे.

9. संशोधन व्याप्ती :-

1. क्षेत्र व्याप्ती :

सदरील संशोधनाच्या क्षेत्र व्याप्तीमध्ये स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली या जिल्हयात असणाऱ्या पदवीस्तरावरील महाविद्यालयाचा समावेश केला जाणार आहे.

2. आशय व्याप्ती :

सदरील संशोधनाच्या आशय व्याप्तीमध्ये पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांचा व्यावसायीक विकास या आशयापूरता मर्यादीत असेल.

3. घटक व्याप्ती :

सदरील संशोधनाच्या घटक व्याप्तीमध्ये पदवीस्तरवरील महाविद्यालय, महिला प्राध्यापिका, व्यावसायीक विकास या संदर्भात व्याप्त असेल.

10. परिमर्यादा :-

1. क्षेत्र मर्यादा :

सदरील संशोधन हे स्वामी रामानंद तीर्थ महाराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयापुरते मर्यादीत असेल.

2. आशय मर्यादा :

सदरील संशोधन हे स्वामी रामानंद तीर्थ महाराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत येणाऱ्या पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकास या आशयापुरते मर्यादीत असेल.

3. घटक मर्यादा :

सदरील संशोधन हे पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या महीला प्राध्यापकांचा व्यावसायीक विकास या घटका पुरते मर्यादीत असेल.

4. काल मर्यादा :

1. सदरील संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2017-19 या कालावधी पूरते मर्यादित असेल.
2. सदरील संशोधनाचे निष्कर्ष महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकासा पुरतेच मर्यादीत असतील.

11. संशोधन पध्दती :

प्रस्तावीत संशोधनातून पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत महिला प्राध्यापकांच्या व्यावसायीक विकास विषयक अभ्यास करावयाचा असल्यामूळे या संदर्भात माहिती मिळवीण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्याचे योजले आहे.

12. संशोधनाची साधने :

संशोधन उद्दीष्टे पुर्तीसाठी तसेच मांडलेल्या परिकल्पना पडताळणीसाठी न्यादर्शातून येणारी माहिती महत्वाची असते. ही माहिती व आकडेवारी संकलीत करण्यासाठी संशोधकाने पुढील माहिती संकलन साधनाचा वापर करण्याचे योजीले आहे.

1. महिला प्राध्यापकांसाठी प्रश्नावली

13. जनसंख्या :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत येणाऱ्या लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्यातील 381 पदवीस्तरावरील महाविद्यालयाचा समावेश केला जाणार आहे. तसेच 381 महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या सर्व महिला प्राध्यापकांचा समावेश जनसंख्येत करण्याचे योजले आहे.

14. न्यादर्श :

सदरील संशोधनासाठी संशोधक न्यादर्श निवडण्यासाठी पुढील पध्दतीचा वापर करणार आहे.

1. महाविद्यालय निवड 50 % जिल्हानिहाय लॉटरी पध्दतीने.
2. प्राध्यापीका निवड :- पदवीस्तरावरील महाविद्यालयात कार्यरत सर्व प्राध्यापीका

15. सांख्यिकीय तंत्र :-

प्रस्तुत संशोधन कार्यातील प्राप्त माहितीचा अर्थ लावण्यासाठी शेकडेवारी सांख्यिकीय तंत्राचा उपयोग करण्याचे योजीले आहे.

16. प्रत्यक्ष कार्यवाही :

प्रस्तुत संशोधन शीर्षकांतर्गत संशोधकाने पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याचे योजीले आहे.



19. संदर्भ सुची :

1. पंडीत बी.बी. (2007), शिक्षणातील संशोधन संख्यात्मक आणि गुणात्मक, पुणे, नित्यनुतन प्रकाशन.
2. डॉ. बी.ए.शर्मा (2011), यु.जी.सी. शिक्षणशास्त्र, मेरठ, राज प्रिटर्स.
3. डॉ.प्रमोद जोशी (2010), शिक्षणशास्त्र, नागपुर, विद्या प्रकाशन.
4. http://vikipedia.in/womaneducation
5. http://www.ncte.in/homepage
6. http://www.srtmu.ac.in/collegelist

मार्गदर्शक **संशोधक**

डॉ. व्ही.के. कदम **श्री. रवि अरुण नरवाडे**